Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing… **Date: 23/08/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष


### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

आपल्या वाचण्या, आतल्या वाचण्या... आपलं महानगर My महानगर.com www.mymahanagar.com

# दिनविशेष

## ख्यातनाम कवी, लेखक विंदा करंदीकर



गोविंद विनायक करंदीकर उर्फ विंदा करंदीकर हे मराठीतील ख्यातनाम कवी, लेखक व समीक्षक होते. त्यांचा जन्म २३ ऑगस्ट १९१८ रोजी सिंधुदुर्ग येथे झाला. विंदांनी त्यांचे शिक्षण कोल्हापूर येथे पूर्ण केले. हैदराबाद मुक्ती संग्रामात त्यांनी भाग घेतला आणि त्यासाठी तुरुंगवासही भोगला. बसवेश्वर कॉलेज, रत्नागिरी, रामनारायण रुईया महाविद्यालय, मुंबई, एस.आय.ई.एस. कॉलेज इत्यादी महाविद्यालयांमध्ये ते इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होते. विंदांचे वैयक्तिक जीवन साधे, स्वावलंबी राहिले. त्यांनी स्वातंत्र्य-सैनिकांना मिळणारे वेतन पण कधी स्वीकारले नाही.

कवी, लघुनिबंधकार, भाषांतरकार, समीक्षक आणि विचारवंत अशा विविध नात्यांनी त्यांची कामगिरी मौलिक स्वरूपाची आहे. विंदांच्या 'स्वेदगंगा', 'मृद्गंध', 'धृपद', 'जातक', 'विरूपिका' आणि 'अष्टदर्शने' या सहा कवितासंग्रहांत मिळून साडेचारशेच्या आसपास कविता समाविष्ट आहेत. 'स्वेदगंगा', 'मुंबई', 'लोकशक्ति ही', 'विश्वरूप', 'मजूर' इत्यादी कवितांमध्ये वक्तृत्वपूर्णता आहे. 'माझ्या मना, बन दगड', 'ती जनता अमर आहे!', 'दातापासून दाताकडे' या विंदांच्या प्रसिद्ध आणि परिणामकारक कविता आहेत. त्यांच्या 'रक्तसमाधि', 'त्रिवेणी', 'मुक्तीमधलें मोल हरवलें', 'सनातनी', 'संहिता', 'रूपक', 'दादरा', 'दीपचंदी' ही तालचित्रे, 'झपताल', 'भारतीय कविता', 'स्त्रियांसाठी स्थानगीत' या कविता वैशिष्ठ्यपूर्ण आहेत. 'सरोज नवानगरवाली', 'बकी', 'मथूआत्ते', 'कावेरी डोंगरे' ही व्यक्तिचित्रेही प्रत्ययकारी आहेत. विंदांच्या बालकवितांचे अकरा संग्रह आहेत. देशाच्या साहित्य क्षेत्रातला सर्वोच्च प्रतिष्ठेचा एकोणचाळीसावा ज्ञानपीठ पुरस्कार त्यांना अष्टदर्शने या साहित्यकृतीसाठी प्रदान करण्यात आला. वि.स. खांडेकर आणि कुसुमाग्रजांनंतर हा पुरस्कार मिळवणारे ते तिसरे मराठी साहित्यिक ठरले. याशिवाय करंदीकरांना महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार, कबीर सन्मान, जनस्थान पुरस्कार सारखे अनेक सन्मान व पुरस्कार मिळाले. अशा या थोर कवीचे १४ मार्च २०१० रोजी निधन झाले.

Nashik Edition
Aug 23, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * CENTRAL LIBRARY * YEOLA DIST. NASHIK *

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401